# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरारयांचेकार्यालय
रामनगरसुष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनीक्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेस नोट क्रमांक - १०९/२०२५ दिनांक ०६/०३/२०२५

## प्रेसनोट

### "नविन फौजदारी कायदे विषयक मार्गदर्शन कार्यशाळा" आयोजना बाबत

-----------------------------

दिनांक ०५/०३/२०२५ रोजी सकाळी ११.३० वा. मिरा-भाईंदर-वसई विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत परिमंडळ-३, विरार यांचे मार्गदर्शनाखाली बोळींज पोलीस स्टेशन तर्फे क्लब-१, ग्लोबल सीटी विरार प. येथे नविन फौजदारी कायदे विषयक मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यशाळेकरीता प्रमुख मान्यवर म्हणून मा. श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त मिरा-भाईंदर, वसई-विरार तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून ॲड. मा. श्री. पुनित चर्तुवेदी हे उपस्थित होते. तसेच मा. श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त , परिमंडळ-३, मा. श्री. बजरंग देसाई, सहायक पोलीस आयुक्त विरार, परिमंडळ-३ मधील सर्व प्रभारी तसेच दुय्यम अधिकारी यांचे सह १) शांतात मोहल्ला कमीटीचे सदस्य २) महिला दक्षता समिती सदस्य ३) शाळा महाविद्यालयाचे शिक्षक वर्ग ४) प्रतिष्ठीत नागरीक ५) पत्रकार बंधू ६) विवा कॉलेज ऑफ लॉ चे प्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

उपस्थितांना प्रमुख वक्ते ॲड. श्री. पुनित चर्तुवेदी यांनी नविन फौजदारी कायदे १) भारतिय न्याय संहिता २०२३ २) भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ ३) भारतीय साक्ष अधिनियम २०२३ या कायद्यांची माहिती देवून मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमास विष्णु वामन ठाकुर चारिटेबल ट्रस्ट चे विवा कॉलेज ऑफ लॉ, विरार प. यांचे सौजन्य लाभले.







मिरा-भाईंदर , वसई-विरार
पोलीस आयुक्तालय
अंतर्गत परिमंडळ - ३ विरार
मार्गदर्शन
कार्यशाळा
अधिनियम
२०२३


प्रमुख मान्यवर
प्रमुख वक्ते
प्रमुख उपस्थिती

